# उल्लास

## प्रवेशिका (भाग - 1)




राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
राज्य साक्षरता केंद्र

## उल्लास प्रवेशिका (भाग - 1)


- **प्रेरणा :**
  **मा. ना. दिपक केसरकर**
  मंत्री, शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य.
  **मा. रनजीत सिंह देओल**
  प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य.
  **मा. सूरज मांढरे**
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र, पुणे.
- **मार्गदर्शन :**
  **श्री. अमोल येडगे** (भा.प्र.से.),
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **डॉ. महेश पालकर**
  संचालक, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  **श्रीम. उषा शर्मा,** प्रोफेसर एवं प्रभारी,
  राष्ट्रीय साक्षरता केंद्र– कक्ष, एनसीईआरटी, नवी दिल्ली.
  **श्री. रमाकांत काठमोरे,** सहसंचालक,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **निर्मिती व संपादन :**
  **डॉ. नेहा बेलसरे,** उपसंचालक, राज्य साक्षरता केंद्र,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्रीम. रत्नमाला खडके,** प्रभारी प्राचार्य,
  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अकोला (महाराष्ट्र).
  **डॉ. मंजुषा क्षीरसागर,** प्रभारी प्राचार्य,
  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे (महाराष्ट्र).
- **निर्मिती, संपादन व सल्लागार – हिंदी उल्लास (CNCL) :**
  **श्रीम. बाणी बोरा,** वरिष्ठ सल्लागार , राष्ट्रीय साक्षरता केंद्र–कक्ष, एनसीईआरटी, नवी दिल्ली.
  **याचना गुप्ता,** वरिष्ठ सल्लागार , राष्ट्रीय साक्षरता केंद्र–कक्ष, एनसीईआरटी, नवी दिल्ली.
  **शिवा श्रीवास्तव,** वरिष्ठ सल्लागार , राष्ट्रीय साक्षरता केंद्र–कक्ष, एनसीईआरटी, नवी दिल्ली.
  **रोहित नैनवाल,** सल्लागार , राष्ट्रीय साक्षरता केंद्र–कक्ष, एनसीईआरटी, नवी दिल्ली.
  **सोनाली,** कनिष्ठ प्रकल्प सहायक, राष्ट्रीय साक्षरता केंद्र–कक्ष, एनसीईआरटी, नवी दिल्ली.
- **समन्वयक :**
  **डॉ. गितांजली बोरुडे,** विभाग प्रमुख,
  राज्य साक्षरता केंद्र, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्री. सचिन चव्हाण,** विभाग प्रमुख,
  सामाजिकशास्त्र विभाग , राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्री. पंढरीनाथ जाधव,** अधिव्याख्याता,
  राज्य साक्षरता केंद्र, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्री. अण्णासाहेब कुटे,** विषय सहायक,
  राज्य साक्षरता केंद्र, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **तांत्रिक साहाय्य व डिझायनिंग :**
  **श्री. स्वप्निल वैरागडे**, शिक्षक, जि. प. प्राथ. शाळा महाबळा, ता. सेलू, जि. वर्धा.
- **मुखपृष्ठ रेखाटन :**
  **श्री. सुभाष जीवा राठोड**, कलाशिक्षक, दीपचंद चौधरी विद्यालय, सेलू, जि. वर्धा.
- **प्रथम आवृत्ती :** सप्टेंबर, 2023
- **अर्थसाहाय्य :** राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.
- **मुद्रक :** रुना ग्राफिक्स, पुणे


- © सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.

# उल्लास

## प्रवेशिका (भाग - 1)




राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
राज्य साक्षरता केंद्र

# प्रस्तावना

शिक्षक हा सर्वांगीण विकासाचा पाया आहे. सर्वांसाठी सर्वसमावेशक आणि समान गुणवत्तेचे शिक्षण सुनिश्चित करणे आणि सर्वांसाठी निरंतर अध्ययनाच्या संधींना प्रोत्साहन देणे हे SDG 4 च्या उद्दिष्ट प्राप्तीसाठी आवश्यक आहे. मूलभूत साक्षरता प्राप्त करण्याची संधी, शिक्षण मिळणे आणि उपजीविका प्राप्त करणे यांकडे प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क म्हणून पाहिले पाहिजे. साक्षरता आणि मूलभूत शिक्षण या गोष्टी व्यक्तीसाठी वैयक्तिक, नागरिक, आर्थिक आणि निरंतर अध्ययनाच्या संधींचे नवे जग खुले करतात. त्यामुळे त्यांची वैयक्तिक आणि व्यावसायिक प्रगती होऊ शकते असे राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० मधील प्रौढ शिक्षण या घटकामध्ये नमूद केलेले आहे. समाजात काही कारणास्तव साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त करू न शकलेल्या पंधरा वर्षे व त्यापेक्षा जास्त वयाच्या व्यक्तींना वाचन आणि लेखनाच्या संधीसोबतच अत्यावश्यक जीवनकौशल्य प्राप्त करण्याच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शिक्षणाची गरज आहे. हाच संदर्भ लक्षात घेत व राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० मध्ये शिफारशींना कार्यान्वित करण्यासाठी भारत सरकारने 'नवभारत साक्षरता' कार्यक्रम १ एप्रिल, २०२२ पासून सुरू केला आहे. महाराष्ट्र राज्यामध्येही केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे 'नवभारत साक्षरता' कार्यक्रमाची अंमलबजावणी करणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

या योजनेत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञानासह एकविसाव्या शतकातील नागरिकांसाठी आवश्यक अन्य घटकांना समाविष्ट केले आहे. उदा. महत्त्वपूर्ण जीवन कौशल्यांमध्ये वित्तीय साक्षरता, डिजिटल साक्षरता, वाणिज्यिक कौशल्ये, बालसंगोपन व शिक्षण, कुटुंब कल्याण, स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्धीसाठी व्यावसायिक कौशल्ये यांचा अंतर्भाव आहे. असाक्षरांना पायाभूत शिक्षण प्रारंभिक स्तरापासून माध्यमिक स्तराच्या समकक्षतेसह दिले आहे. आजीवन शिक्षणाच्या गरजा लक्षात घेऊन कला, विज्ञान, तंत्रज्ञान, संस्कृती, खेळ आणि मनोरंजन या बाबींना महत्त्वाचे स्थान आहे. शिवाय हा अभ्यासक्रम स्थानिक असाक्षरांना त्यांच्या आवडीनिवडी, उपयोगिता व अन्य विषयांचा आधार देतो. म्हणजेच नवभारत साक्षरता कार्यक्रमाचा अभ्यासक्रम मनुष्याचा विकास करत न्यायसंगत, तर्कशुद्ध तथा उत्कृष्ट नागरिक निर्माण करतो.

नवभारत साक्षरता कार्यक्रमाशी संबंधित दस्तऐवजांमध्ये 2011 च्या जनगणनेनुसार देशात 15 वर्षे आणि त्यापेक्षा अधिक वय असणाऱ्या असाक्षरांची एकूण संख्या नमूद केली आहे. ज्यात एकूण असाक्षरांची संख्या 25.76 कोटी असून 9.08 कोटी पुरुष, 16.68 कोटी महिला आहेत.

सन 2009-10 ते 2017-18 च्या दरम्यान 'साक्षर भारत' कार्यक्रम देशभरात राबविला गेला. यात 7.64 कोटी व्यक्तींना साक्षर प्रमाणित करण्यात आले. अर्थात वर्तमान परिस्थितीत 18.12 कोटी प्रौढ अजूनही असाक्षर आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 ने येत्या 10 वर्षात म्हणजे 2030 पर्यंत 100% साक्षरता प्राप्तीचे लक्ष निर्धारित केलेले आहे. लक्ष प्राप्तीसाठी राष्ट्रीय व राज्य स्तरावर साक्षरता केंद्रे स्थापन करण्यात आलेली आहेत.

'सर्वांसाठी शिक्षण' यामध्ये सहभागी होणारे सर्व घटक साक्षर होतीलच तसेच ते आपल्या जीवनातील संघर्ष आणि अडचणींचा सामना करीत समृद्ध जीवन जगण्यासाठीही सक्षम होतील.

या अध्ययनार्थींनी आपल्या जीवनात स्वत:च्या बोलीभाषेचा तथा इतर भाषेचा तोंडी प्रयोग केलेला आहे. प्रत्यक्ष जीवनात घेणे–देणेचा व्यवहार करीत गणिताला समजून घेतले आहे. त्यांना समजपूर्वक वाचणे, लिहिणे आणि संख्याज्ञान शिकवण्याची आवश्यकता आहे. ज्यामुळे गुणवत्तापूर्ण आणि स्वाभिमानाने जगण्याचा त्यांचा मार्ग खुला होईल.

आंतरराष्ट्रीय साक्षरता संघाच्या मतानुसार 'साक्षरता' एक व्यापक संकल्पना आहे, जी केवळ अक्षर आणि संख्याज्ञानापर्यंत मर्यादित नाही. यात विभिन्न संदर्भातील विषयांना दृश्य, श्राव्य आणि डिजिटल सामग्रीचा उपयोग करून

ओळखणे, समजणे, रचना करणे, गणना करणे आणि संवाद करण्याच्या क्षमतांचा समावेश आहे. यानुसार पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान क्रियाशील होऊन चांगले जीवन जगण्यासाठी मदत करते.

प्रत्येक नागरिकाचा पायाभूत साक्षरता प्राप्त करणे, शिक्षण घेणे, जीवनोपयोगी शिक्षणाच्या संधी मिळविणे हा अधिकार आहे, साक्षरता आणि पायाभूत शिक्षण वैयक्तिक, नागरिक, सामाजिक, आर्थिक आणि आजीवन शिक्षणाच्या संधीचे एक नवीन जग खुले करते.

राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 ने वरील सर्व बाबी लक्षात घेऊन शिक्षण मंत्रालयाद्वारा नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत असाक्षरांसाठी 'उल्लास' प्रवेशिका चार भागात तयार केल्या आहेत. ज्यामध्ये भाषा व गणित विषय एकात्मिक करण्यात आले आहे. विषय सामग्रीच्या रूपात तेरा विषय (थीम) ठरविले गेले आहेत, जे सध्या आपल्या अवती–भोवती दिसतात.

कुटुंब आणि शेजार, संवाद, आपली संस्कृती, आपल्या अवती–भोवती, आहार आणि आरोग्य, मतदान, कायदेविषक माहिती, आपत्तींचे प्रकार व स्वरूप, काळानुरूप बदलत्या गोष्टी, प्रवास, मनोरंजन, आर्थिक साक्षरता, डिजिटल साक्षरता हे विषय भाषा व गणिताला जोडून रोचक पद्धतीने त्यांच्या दैनंदिन जीवनातील अनुभव घेत मांडले आहेत. तसेच मराठी भाषा आणि अंकगणिताला वाचण्या–लिहिण्याच्या संधी दिलेल्या आहेत. असाक्षरांना वाचणे–लिहिणे आणि अंकगणित शिकण्यासाठी स्वयंसेवकांद्वारे उपयोगात आणली जाईल, जी असाक्षरांना शिकण्यासाठी मदत करेल. या मार्गदर्शिकेत साक्षरतेची व्यापक संकल्पना, भाषा व गणिताचे अध्ययन मुद्दे आणि शिकणे–शिकवण्याची प्रक्रिया यावर विस्तृत चर्चा केली आहे. 'उल्लास प्रवेशिका आणि मार्गदर्शिकेमध्ये दिले गेलेले मुद्दे उदाहरण स्वरूपात आहेत. अध्ययनार्थींचा स्तर, क्षमता, गरजा आणि स्थानिक परिस्थितीला लक्षात घेऊन त्यामध्ये आवश्यकतेनुसार बदल केला जाऊ शकतो.

'उल्लास' प्रवेशिकेत असलेल्या पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञानासंबंधी शिक्षणातील मुद्द्यांना केंद्रबिंदू मानून अध्ययनार्थी स्वयंसेवकांसाठी ऑनलाईन मोड्यूल व व्हिडिओ कार्यक्रमांची निर्मिती केली गेली आहे. हे कार्यक्रम दीक्षा (DIKSHA Portal) वर उपलब्ध आहेत. त्यांच्या मदतीने असाक्षरांना शिकणे–शिकवण्यासाठी मदत मिळेल.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे, प्रवेशिका आणि मार्गदर्शिका भाषांतर तथा अनुकूलन करणाऱ्या सर्व विषयतज्ज्ञांचे आणि अधिकारी, कर्मचारी यांच्या अथक परिश्रमासाठी कृतज्ञता व्यक्त करीत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी तयार केलेल्या 'उल्लास' प्रवेशिकेतील साहित्याचे मराठी भाषेत भाषांतरित केले आहे, त्या सर्वांप्रती आम्ही कृतज्ञ आहोत. (आपल्या सूचनांचे या प्रवेशिका अजून उत्तम करण्यासाठी स्वागत आहे.)

या प्रवेशिका अधिक परिपूर्ण करण्यासाठी आपल्या सूचनांचे स्वागतच आहे.

धन्यवाद.

**श्री. अमोल येडगे** (भा.प्र.से.)
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

## शुभेच्छा!

उष:कालातील एक आशेचा किरण प्रत्येक व्यक्तीला प्रकाशाकडे नेतो. राष्ट्रीय साक्षरता केंद्र, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद नवी दिल्ली, येथे निर्माण करण्यात आले आहे. त्यांनी तयार केलेल्या 'उजास'च्या सर्वांसाठी शिक्षणाच्या चार प्रवेशिका असाक्षरांना साक्षरतेकडे जाण्यासाठी मदत करणार आहेत. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे येथील राज्य साक्षरता केंदाने 'उजास' प्रवेशिकांचे भाषांतर व अनुकूलन केले आहे.

'उजास' प्रवेशिका असाक्षरांना त्यांच्याकडे असलेले भक्कम अनुभव, संघर्ष व आव्हानांना तोंड देण्याच्या ताकदीला स्थान देतात. जे असाक्षर जीवन जगण्यासाठी सक्षम आहेत, पण साक्षर नाहीत अशांचे उत्तम साथीदार बनतात.

प्रस्तुत प्रवेशिका पंधरा वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वय असणाऱ्या असाक्षरांशी आपल्या मातृभाषेतून संवाद साधत परस्परांचे ऐकून आणि समजून घेतात. याबरोबरच दैनंदिन व्यवहाराद्वारे गणिताचा उपयोग शिकवितात.

'उजास' च्या चारही प्रवेशिका भाषा व गणित शिकण्याच्या प्रक्रिया एकात्म करून सोबत चालतात. भाषा अभ्यासात भाषेची समज वाढविणे अर्थात वाचून समजून घेणे, समजपूर्वक वाचन याचा अंतर्भाव आहे. ज्यात वाचन, लेखनासह व्यक्त होणे, समजून घेऊन लिहिणे, स्व–मत तयार करणे, प्रतिक्रिया देणे इत्यादींचा समावेश आहे. गणिताच्या अभ्यासात संख्याज्ञान, गणितीय संबोध आकलन व त्याचे व्यावहारिक उपयोजन यांवर भर दिलेला आहे.

असाक्षरांचे जीवन समृद्ध करण्यासाठी जीवन कौशल्यांचा अंतर्भाव त्यात आहे. जसे – कुटुंब आणि शेजार, संवाद, आपली संस्कृती, आपल्या अवती–भोवती, आहार आणि आरोग्य, मतदान, कायदेविषक माहिती, आपत्तींचे प्रकार व स्वरूप, काळानुरूप बदलत्या गोष्टी, प्रवास, मनोरंजन, आर्थिक साक्षरता, डिजिटल साक्षरता.

असाक्षरांच्या गरजा लक्षात घेत वाचन–लेखनाची प्रक्रिया सहज, सुलभ तथा अर्थपूर्ण बनविणे हाच आमचा प्रवेशिका तयार करण्या मागचा उद्‌देश आहे.

जय हिंद!

**श्री. महेश पालकर**
संचालक
शिक्षण संचालनालय (योजना),
महाराष्ट राज्य, पुणे.

## मनोगत

जन्माला येणाऱ्या प्रत्येकाने शिक्षण घेऊन शिक्षित होणे हा मानवी हक्क आहे. त्यामुळे पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान शिक्षणाचे अविभाज्य अंग बनते. शिक्षण व्यक्तीला जबाबदार नागरिक बनविण्यास मदत करते. शिवाय व्यक्तीला वैयक्तिक आणि व्यावसायिक विकासाचा मार्ग खुला होतो.

राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मधील शिफारशींनुसार राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली येथे राष्ट्रीय साक्षरता केंद्राची (CNCL - Cell for National Centre for Literacy) स्थापना करण्यात आली आहे. प्रस्तुत केंद्र सर्वांच्या शिक्षणासाठी समर्पित असून पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान, महत्त्वपूर्ण जीवन कौशल्ये, व्यावसायिक कौशल्य विकास, आजीवन शिक्षण व पायाभूत शिक्षणासाठी कटिबद्ध आहे. ही पाच क्षेत्रे राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 ने उल्लेखित केलेली आहेत.

सन 2030 पर्यत 100% साक्षरता प्राप्ती ध्येयासाठी भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने 'नवभारत साक्षरता कार्यक्रम' सुरू केला आहे. असाक्षरांच्या शिक्षण प्रवासाला 'उल्लास' प्रवेशिका सोबतीसाठी आहेतच. याद्वारे असाक्षर साक्षर होणार आहेत. ही सर्व शिक्षणविषयक सामग्री DIKSHA (www.diksha.gov.in) पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्यात राज्य साक्षरता अभियान प्राधिकरणाचे संचालक, योजना मा. डॉ. महेश पालकर यांचे प्रस्तुत कार्यात मोलाचे सहकार्य लाभले आहे.

चला, आपण सर्वजण मिळून भारताला 100 टक्के साक्षर करूया आणि सामाजिक दायित्वाला पूर्णत्वास नेऊया!

जय हिंद !


दिनांक :

पुणे.

**डॉ. नेहा बेलसरे**
उपसंचालक, राज्य साक्षरता केंद्र
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| • | प्रस्तावना | III |
| • | शुभेच्छा! | V |
| • | मनोगत | VI |
| 1. | कुटुंब आणि शेजार | 1 |
| 2. | संवाद (एकमेकांशी बोलूया) | 25 |
| 3. | आपली संस्कृती | 57 |




## संवादासाठी :

1) हे चित्र कशाचे आहे.
2) चित्रात कोण काय-काय करीत आहेत?
3) तुमच्या परिसरातील किराणा दुकानात कोणकोणते साहित्य मिळते?
4) या चित्रात एकूण किती मुले आहेत?
5) चित्रामध्ये 4 हा अंक कुठे लिहिलेला आहे?
6) चित्रात एकूण किती खाटा आहेत?


बाल विद्यालय
बाल विद्यालय
स्वस्त धान्याचे दुकान
रिंकू सायकल मार्ट


# 1. कुटुंब आणि शेजार

**आपण शिकूया!**

| अ | आ | न | प | स | र | व |
|---|---|---|---|---|---|---|

- 1 ते 9 पर्यंतच्या संख्या ओळखणे, वाचणे आणि लिहिणे.

## चित्रावरून अंदाज लावा व वाचा.




दुकान



कुटुंब




लोक




गल्ली



स्वयंपाक घर



दरवाजा



घर



शेजारी




वकील

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**


- सहभागी व्यक्तींना क्रमाक्रमाने सर्व चित्रांची ओळख करून द्या.
- चित्रांखाली त्याच्याशी संबंधित शब्द दिलेले आहेत. चित्रावरून समर्पक शब्दांचे अंदाज बांधून वाचायला लावा.
- चित्रांखालील शब्दावर बोट ठेवून वाचन करून घ्या.

## चित्रावरून अंदाज लावा व वाचा.

तुमच्या घरी खालीलपैकी कोणत्या वस्तू आहेत? त्याखालील चौकटीत (✓) अशी खूण करा.



मातीची चूल




खाट

फेब्रुवारी

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | | | | |


कॅलेंडर (दिनदर्शिका)



सायकल



सिलेंडर



नळ

## वाचा आणि लिहा.

**अ**



**अ**ननस



**अ**जगर

अ अ अ

**आ**



**आ**रसा



**आ**गगाडी

आ आ आ

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागी व्यक्तींना क्रमाक्रमाने सर्व चित्रांची ओळख करून द्या.
- चित्रांच्या खाली दिलेल्या शब्दांवर बोट ठेवून वाचा.
- सहभागी व्यक्तींकडून अक्षर लिहून घ्या.


  ‘अ’ आणि ‘आ’ चा ध्वनी यातील अंतर समजावून सांगत उर्वरीत अक्षरे वाचून आणि लिहून घ्या.

## वाचा आणि लिहा.

न



नदी




नळ

ना



नारळ




नाक

## वाचा आणि लिहा.

प



पपई




पतंग

पा



पालक




पाल

## वाचा आणि लिहा.

स



समई



ससा

स स स

सा




सात




सायकल

सा सा सा

## वाचा आणि लिहा.

र



रथ



रसगुल्ले

र र र

रा



राखी



राजा

रा रा रा

## वाचा आणि लिहा.

व



वड



वजन

व व व

वा



वाघ



वाटी

वा वा वा

## ▪ माझे शब्द

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- कुटुंब आणि शेजार या विषयांवर एकमेकांशी बोला.
- सहभागी व्यक्तींच्या परिसरातील लोकांची संस्कृती आणि सामाजिक संबंध यांवर चर्चा करा.
- सहभागी व्यक्तींना विचारून या विषयाशी संबंधित तीन ते चार शब्द लिहा.
- हे शब्द त्यांच्या बोलीभाषेतीलही असू शकतात, जसे स्वयंपाक घराला रांधणी घर किंवा स्वयंपाकाची जागा, रस्त्यासाठी सडक, रोड, गल्ली, वाट इत्यादी.

# अरुणाचे कुटुंब



मूळ स्रोत : सुशील शुक्ल

**लावणी केली भाताची,**
**बाजी लावली जीवाची.**

## ▪ तुम्हांला काय वाटते?

प्रश्न 1 : वरील चित्रामध्ये खुरपणीचे काम सुरू आहे का? होय ☐ नाही ☐

प्रश्न 2 : तुमच्या भागात भातशेती केली जाते का? होय ☐ नाही ☐

प्रश्न 3 : तुमच्या कुटुंबात एकत्रितपणे व्यवसाय केला जातो का? होय ☐ नाही ☐

प्रश्न 4 : त्या व्यवसायामध्ये तुम्ही तुमच्या कुटुंबाला मदत करता का? होय ☐ नाही ☐

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- वरील प्रश्नांच्या आधारावर व्यक्तीच्या कुटुंबाच्या व्यवसायांबाबत चर्चा करा.
- वरील प्रश्नांच्या खाली बोट ठेवून वाचा आणि सहभागींना होय किंवा नाही वर (✓) अशी खूण करायला सांगा.

## पाहा, वाचा आणि लिहा.

अ अक्षराने सुरू होणारा शब्द ओळखून लिहा.

अननस रस पाहा पान

आ अक्षराने सुरू होणारा शब्द ओळखून लिहा.

बाग आई नळ मध

व अक्षराने सुरू होणारा शब्द ओळखून लिहा.

वजन मगर वार सर

वा अक्षराने सुरू होणारा शब्द ओळखून लिहा.

वाघ रवा साधन आवाज

न अक्षराने सुरू होणारा शब्द ओळखून लिहा.

वारा नस गारा नाणी

ना अक्षराने सुरू होणारा शब्द ओळखून लिहा.

नदी आदर नाव वाघ

र अक्षराने सुरू होणारा शब्द ओळखून लिहा.

रथ मासा वजन पालक

स अक्षराने सुरू होणारा शब्द ओळखून लिहा.

घर वकील पाल समई

प अक्षराने सुरू होणारा शब्द ओळखून लिहा.

अननस नाक पपई सात

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागींना वाचण्याची आणि लिहिण्याची संधी द्या.
- सहभागींना शब्द लिहिण्यासाठी मदत करा.
- दिल्या गेलेल्या अक्षरांनी सुरू होणाऱ्या शब्दांची ओळख करून द्या.
- सहभागींनी लिहिलेल्या शब्दांचा सराव त्यांच्याकडून करून घ्या.

## मोजा आणि संख्या ओळखा.




1

एक सूर्य




2

दोन मोजे




3

तीन चेंडू



4

चार बाटल्या



5


पाच भोवरे

## ▪ मोजा आणि संख्या ओळखा.




6

सहा लॉलीपॉप



7

सात पतंग



8

आठ पेन




9


नऊ पुस्तके

## ▪ दिलेल्या संख्येनुसार वस्तू मोजून त्याभोवती वर्तुळ (◯) करा.

4 चार पतंग




7 सात अननस



**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागींना प्रोत्साहित करून संख्या ओळखायला सांगा आणि तेवढ्या वस्तू मोजून त्या भोवती वर्तुळ (◯) करून घ्या.

## मोजा आणि संख्या ओळखून जोड्या लावा.




**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागींकडून समूहात दाखविलेल्या वस्तू मोजून, लिहिलेल्या संख्येशी जोडी लावून घ्या.

## ▪ दिलेल्या मोबाईलमध्ये कोणता अंक कुठे आहे?




▪ दिलेल्या चौकटीत तुमचा किंवा तुमच्या परिचित व्यक्तीचा मोबाईल क्रमांक लिहा.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

▪ या मोबाईल क्रमांकामध्ये कोणता अंक एकापेक्षा जास्त वेळा आला आहे ते सांगा व लिहा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |


## ▪ अंक म्हणा व लिहा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 | | 6 | 6 | |
| 2 | 2 | | 7 | 7 | |
| 3 | 3 | | 8 | 8 | |
| 4 | 4 | | 9 | 9 | |
| 5 | 5 | | | | |

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- मोबाईलमध्ये दिलेले अंक लिहिण्याचा सराव करून घ्या.
- तुम्ही सहभागींकडून बिंदूंनी काढलेल्या रेषांच्या मदतीने अंक लिहून घ्या.
- ज्यांना ज्यांना जास्त सरावाची गरज आहे, त्यांना संधी द्या.
- सहभागी मोबाईल पॅडवर लिहिलेल्या संख्या ओळखतील आणि त्याच्या आधारावर संख्या लिहितील असा प्रयत्न करा.

## ▪ भाऊसाहेबांचे कुटुंब बैलगाडीतून जात आहे. पाहा, मोजा आणि लिहा.



- बैलगाडीमध्ये एकूण किती व्यक्ती आहेत? ☐
- बैलगाडीमध्ये किती महिला आहेत? ☐
- टोपलीत किती टरबूजे आहेत? ☐
- बैलगाडीला किती चाके आहेत? ☐
- बैलगाडीमध्ये किती कंदील आहेत? ☐
- बैलगाडीमध्ये किती पुरुष आहेत? ☐

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**


- सहभागींकडून वस्तू मोजून योग्य संख्या लिहिण्याचा सराव करून घ्या.
- संख्यावाचन आणि लेखन यांसाठी सहभागींना मदत करा.
- तुम्हाला वाटत असेल, तर परिसरातील उपलब्ध वस्तूंची मोजणी करून घेऊ शकता.

**ही कविता एकत्र मिळून वाचा.**

# पाऊस

अलगद आले ढग
फार फार फार!
हवा लागे मग
गार गार गार!
आकाशी फुटे फटाके
ढम ढम ढम
वीज लखख चमके
चम चम चम!
आभाळातून पडे पाऊस
सर सर सर!
नदी दुथडी वाहते
भर भर भर!
जमिनीतून पीक येते
वर वर वर!
या गड्यांनो आनंदे
झर झर झर!
वाळूचे बांधू आपण
घर घर घर!
उडण्या पक्षाचे घेऊ
पर पर पर!

*मूळ स्रोत : जयप्रकाश पाटील*



## कवितेत आलेले खालील अक्षरांचे शब्द ओळखून लिहा.

आ ______________ प ______________

न ______________ ह ______________

## चित्र पाहा व रिकाम्या जागी योग्य अक्षर लिहा.

1. सा........ण




2. वा........




3. पा........ल



4. व ........



5. आं........



6. ........ळ



**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**


- सहभागींसोबत मिळून कवितेमध्ये आलेल्या अक्षरांची आणि शब्दांची ओळख करून देणे.
- अक्षरे आणि शब्द लिहिण्यासाठी सहभागींना मदत करणे.
- कवितेला गेय रूपात वाचण्यासाठी प्रोत्साहित करणे.

## टिपण

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- अ, आ, न, प, स, र, व या अक्षरांचे लेखन करण्यास सांगा.
- वरील अक्षरे असलेल्या शब्दांचे लेखन करण्यास सांगा.


टपालघर
मु. पो. शिवापूर
पत्र




चर्चेसाठी :

1) आपली मते इतरांपर्यंत पोहोचविण्यासाठी चित्रातील लोक कोणकोणत्या माध्यमांचा वापर करीत आहेत?
2) तुम्ही कधी टपालघरात गेला आहात का?
3) टपालघरामध्ये आपण कोणकोणत्या कामांसाठी जातो?
4) कोणकोणत्या माध्यमातून आपल्याला बातम्या कळतात?
5) मोबाईलचा वापर बोलण्याव्यतिरिक्त कोणकोणत्या कामांसाठी केला जातो?

# 2. संवाद

(एकमेकांशी बोलूया!)

**आपण शिकूया!**

| इ | ई | ब | त | म | ख | ट | च |
|---|---|---|---|---|---|---|---|

- 10 ते 20 पर्यंतच्या संख्या ओळखणे, वाचणे आणि लिहिणे.
- 20 पर्यंतच्या संख्यांना जोडणे आणि वजा करणे.

## चित्र ओळखा.





वर्तमानपत्र



माईक



गप्पागोष्टी



मोबाईल



पत्र



टेलिव्हिजन




एस.एम.एस.



टेलिफोन




टपाल (पत्र) पेटी

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागींकडून क्रमाक्रमाने चित्रांची ओळख करून घ्या.
- चित्राखाली त्याच्याशी संबंधित शब्द दिलेले आहेत. या चित्रावरून समर्पक शब्दांचे अंदाज बांधून वाचायला लावा.
- चित्रांखालील शब्दांवर बोट ठेवून वाचन करून घ्या.

## चित्र ओळखा.

तुमच्या घरी आणि आजूबाजूला यांमधील कशाचा उपयोग केला जातो? योग्य उत्तराच्या चौकटीत (✓) अशी खूण करा.



रेडिओ




टेलिव्हिजन






टपाल (पत्र) पेटी




पेन

## वाचा आणि लिहा.

इ



इमारत



इस्त्री

इ इ इ

ई



ईडलिंबू






ई-मेल


ई ई ई

## वाचा आणि लिहा.

ब



बकरी



बदक

ब ब ब

बा



बासरी



बाहुली

बा बा बा

## वाचा आणि लिहा.

**बि**



बिस्किटे




बियाणे

बि बि बि

**बी**



बीट



बी

बी बी बी

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- चित्र पाहून शब्द वाचण्यासाठी सहभागींना मदत करा.
- सहभागींकडून अक्षर लिहून घ्या. दिलेल्या जागेत चित्राचे नाव लिहा.

## वाचा आणि लिहा.

त



तबला



तराजू

त त त

ता



तारे




ताट

ता ता ता

## वाचा आणि लिहा.

ति



तिजोरी




तिरंगा

ति ति ति

ती

3

तीन




तीर


ती ती ती

## वाचा आणि लिहा.

म




मका




मगर

म म म

मा



मासा



माशी


मा मा मा

## वाचा आणि लिहा.

मि




मिठाई



मिरची

मि मि मि

मी



मीटर टेप





मीठ

मी मी मी

## वाचा आणि लिहा.

ख



खडू



खजिना

ख ख ख

खा



खार



खाट


खा खा खा

■ वाचा आणि लिहा.

खि



खिडकी



खिळे

खि

खी



खीर

खी

## वाचा आणि लिहा.

ट




टरफल



टरबूज

टा



टाय



टाळ

## ■ वाचा आणि लिहा.

टि




टिकल्या



टिळक

टी



टीन पत्रा

T


टी

## वाचा आणि लिहा.

च




चमचा



चरखा

च

चा



चाक



चाकू


चा

## ■ वाचा आणि लिहा.

चि




चिमणी




चित्ता

ची



चीज



चीर

# शाळेस पत्र

17.02.2023

प्रति,
मा. मुख्याध्यापक,
आदर्श प्रशाला, सातारा

विषय : मुलीच्या गैरहजेरीबाबत....

नमस्कार,

माझी मुलगी संगीता आपल्या शाळेत इयत्ता नववीमध्ये शिकत आहे. माझे सासरे आजारी पडल्यामुळे आम्हाला दहा दिवसांसाठी गावी जावे लागले. हे सगळे अचानक झाल्यामुळे संगीता दहा दिवस शाळेत गैरहजर राहिली. तिच्या रजेचा अर्ज आपणाकडे देता आला नाही. या दहा दिवसांतील तिचा अभ्यास आम्ही पूर्ण करून घेऊ व ती यापुढे नियमितपणे शाळेत येईल व अभ्यास पूर्ण करेल अशी खात्री देते.

धन्यवाद !

आपली विश्वासू

सौ. अंजना कदम
(संगीताची आई)




**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- शाळेला दिलेले वरील पत्र सहभागींना वाचून दाखवा. त्यांना विचारा की, आजवर कधी त्यांना त्यांच्या आयुष्यात पत्र लिहिण्याची गरज पडली होती का?
- पुढे दिलेल्या प्रश्नांच्या खाली बोट ठेवून वाचा आणि सहभागींना होय किंवा नाही या पर्यायावर (✓) खूण करण्यास सांगा.

## वाचा आणि सांगा.

प्रश्न क्र. 1) तुम्हाला कधी पत्र लिहिण्याची गरज पडली आहे का? होय ☐ नाही ☐

प्रश्न क्र. 2) तुमच्या आजूबाजूला टपालपेटी/टपालघर आहे का? होय ☐ नाही ☐

प्रश्न क्र. 3) तुम्ही कधी टपालघरात गेला आहात का? होय ☐ नाही ☐

प्रश्न क्र. 4) टपालघरात तुमचे बचत खाते आहे का? होय ☐ नाही ☐

## पाहा, वाचा आणि लिहा.

इ अक्षराने सुरू होणारा शब्द ओळखून लिहा.

चटणी इमारत चादर तीस ____________

ई अक्षराने सुरू होणारा शब्द ओळखून लिहा.

बाग जीवन ईडलिंबू नवीन ____________

खा अक्षराने सुरू होणारा शब्द ओळखून लिहा.

वजन मगर खाट पचन ____________

टा अक्षराने सुरू होणारा शब्द ओळखून लिहा.

टाय चिमटा बटाटा धपाटा ____________

मी अक्षराने सुरू होणारा शब्द ओळखून लिहा.

मामी तिथे मीरा खीर ____________

बि अक्षराने सुरू होणारा शब्द ओळखून लिहा.

बचत बिल आनंद चीड ____________

खि अक्षराने सुरू होणारा शब्द ओळखून लिहा.

खीर चटपट खिसा खाणे

______________

______________

चि अक्षराने सुरू होणारा शब्द ओळखून लिहा.

चाबूक चिमणी चणे बरणी

______________

______________

मा अक्षराने सुरू होणारा शब्द ओळखून लिहा.

माहिती बिमा मगर चमक

______________

______________

पी अक्षराने सुरू होणारा शब्द ओळखून लिहा.

पपई पाणी पीक पाईप

______________

______________


## माझे आवडीचे कार्य :

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- शब्द वाचण्यासाठी सहभागींना मदत करा. वेगवेगळे ध्वनी असणारे शब्द लिहायला सांगा.
- हे ध्वनी शब्दाच्या सुरुवातीला, मधल्या भागात किंवा शेवटी असू शकतात.
- सहभागींना अक्षर ओळखून त्याच्याशी जुळणारे शब्द लिहिण्यास प्रेरित करा.

## चला, मोजूया!




या नोटेमध्ये 5 हा अंक किती वेळा छापलेला आहे? चित्रातील 5 या अंकावर अशी (✓) खूण करा आणि संख्या लिहा. ☐









या नोटेमध्ये 10 हा अंक किती वेळा छापलेला आहे? चित्रातील 10 या अंकावर अशी (✓) खूण करा आणि संख्या लिहा. ☐


## चला, सगळे मिळून मोजू या!




दहा नळ 10




अकरा खाटा 11




बारा पाने 12




तेरा कपाटे 13




चौदा पतंग 14




पंधरा राख्या 15




सोळा नारळ 16




सतरा डाळिंबे 17



अठरा मासे 18



एकोणीस मोती 19



वीस आगकाड्या 20

- कामिनीच्या कुटुंबात पाच व्यक्ती आहेत. आज तिच्या घरी आणखी चार व्यक्ती आल्या. आता सांगा, कामिनीच्या घरी एकूण किती व्यक्ती आहेत?


 आणि  मिळून झाले 

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5 | व्यक्ती आणि | 4 | व्यक्ती मिळून झाल्या | 9 | व्यक्ती |
| 5 | + | 4 | व्यक्ती मिळून झाल्या | 9 | |
| 5 | + | 4 | = | 9 | |


**5 + 4 = 9**

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**
- सहभागींना चित्रांच्या मदतीने मोजण्याची संधी द्या, म्हणजे ते दहा ते वीस पर्यंत अंक ओळखू शकतील.
- गणितात '+' हे चिन्ह बेरजेचे आहे तर '–'हे चिन्ह वजाबाकीचे आहे आणि '='हे चिन्ह बरोबरचे आहे.


■ नऊ संगणकांमधून दोन संगणक खराब झाले. सांगा किती संगणक चालू स्थितीत आहेत?



नऊ संगणकांमधून



दोन संगणक खराब झाले



चालू स्थितीत राहिलेले संगणक

9 संगणकांमधून – 2 संगणक खराब झाले = 7 संगणक चालू स्थितीत राहिले आहेत.

9 संगणकांमधून – 2 कमी झाले = 7

9 – 2 = 7

$$9 - 2 = 7$$

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- दैनंदिन जीवनात असे अनेक प्रसंग येतात, जेव्हा दोन संख्या मिळवाव्या/एकत्र कराव्या लागतात.
- सहभागींना सराव म्हणून तुम्ही वेगवेगळ्या संख्या मिळवून घेण्याची कृती करवून घेऊ शकता. यासाठी सहभागींना प्रोत्साहित करा.
- नऊ पर्यंतच्या संख्या वापरून वजाबाकी सुद्धा करवून घेऊ शकता.




- एका दुकानदाराजवळ एका कंपनीने मोबाईलचे 18 बॉक्स पाठविले. त्या दुकानदाराने त्यातील 6 बॉक्स दुसऱ्या दुकानदाराकडे पाठवून दिले. आता दुकानदाराजवळ किती बॉक्स उरले आहे?

उत्तर ________

- पोस्टमनने पहिल्या दिवशी 8 पत्रे वाटली. दुसऱ्या दिवशी त्याने 3 पत्रे वाटली, तर पोस्टमनने एकूण किती पत्रे वाटली?

उत्तर ________



- पोस्टमनजवळ एकूण 15 पत्रे होती. संध्याकाळपर्यंत त्याने सर्व पत्रे वाटली. आता पोस्टमनजवळ किती पत्रे उरली?

उत्तर ________

- जावेदजवळ 20 रुपये आहेत. त्यातून त्याने 13 रुपयांची फळे खरेदी केली. आता त्याला किती रुपये खर्च करावे लागतील, जेणेकरून त्याच्याजवळ काहीच रुपये उरणार नाहीत?

उत्तर ________

- कॅल्क्युलेटरवर लिहिलेले अंक पाहा, अशा दोन संख्या कॅल्क्युलेटरमध्ये दाबा, ज्यांची बेरीज 10 येईल, नंतर त्या तपासून पाहा.



जसे :

पहिले 1 बटण + नंतर 9 बटण = 10

पहिले _____ बटण + नंतर _____ बटण = 10

पहिले _____ बटण + नंतर _____ बटण = 10

पहिले _____ बटण + नंतर _____ बटण = 10

- **माझे शब्द**

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- संवाद या विषयावर सहभागींसोबत संवाद साधा. सहभागींना विचारून या विषयाशी मिळतेजुळते 3 ते 4 शब्द लिहा.
- हे शब्द त्यांच्या स्वतःच्या बोलीभाषेतील असू शकतात. उदा. लाऊडस्पीकरसाठी भोंगा इत्यादी.
- मोबाईल, टेलिफोन, पत्र इ. संवादाच्या मुख्य साधनांवर चर्चा करा.

## सोबत मिळून वाचा.

***अंधेर नगरी , चौपट राजा। आणे शेर भाजी, आणे शेर खाजा। (खाऊ)***



दुकानदार : पीठ, डाळ, मीठ, तूप, साखर, मसाला आणि तांदूळ एक आण्यास एक शेर घ्या. (गोवर्धनदास बाजारात आहे. तो वाण्याच्या (किराणाच्या) दुकानावर जाऊन वस्तूंच्या किमती विचारतो.)

गोवर्धनदास : काय भाऊ, पीठ काय शेर?

दुकानदार : एक आणे शेर.

गोवर्धनदास : आणि तांदूळ?

दुकानदार : एक आणे शेर.

गोवर्धनदास : आणि साखर?

दुकानदार : एक आणे शेर.

गोवर्धनदास : आणि तूप

दुकानदार : एक आणे शेर.



| | | |
|---|---|---|
| गोवर्धनदास | : | सर्व एक आणे शेर? खरंच! |
| दुकानदार | : | होय महाराज, मी काय खोटं बोलणार आहे ! |
| | | (गोवर्धनदास भाजीवालीजवळ जाऊन ) |
| गोवर्धनदास | : | काय ताई, भाजी काय भाव? |
| भाजीवाली | : | बाबाजी, दोडके, मुळा, कोथिंबीर, मिरची सर्व भाज्या एक आणे शेर. |
| गोवर्धनदास | : | सर्व भाज्या एक आणे शेर. वा ! वा ! आनंदी आनंद आहे. इथे सर्व वस्तू एक आणे शेरातच आहेत. |
| | | (मिठाईवाल्याजवळ जाऊन) काय भाऊ, मिठाई काय शेर? |
| मिठाईवाला | : | बाबाजी! लाडू, जिलेबी, गुलाबजामून सर्व खाऊ एक आणे शेर. |
| गोवर्धनदास | : | वा! वा! आनंदी आनंद आहे ! काय बाळ, माझी मस्करी तर करत नाहीस ना? खरंच! सर्व एक आणे शेर? |

मिठाईवाला : होय बाबाजी, खरोखरंच सर्व एक आणे शेर. या नगरीची हीच रीत आहे. इथे सर्व वस्तू एक आण्याला शेर या भावानेच विकल्या जातात.

गोवर्धनदास : या नगराचे नाव काय आहे बाळा?

मिठाईवाला : अंधेर नगरी.

गोवर्धनदास : आणि राजाचे नाव काय आहे?

मिठाईवाला : चौपट राजा.

गोवर्धनदास : वा ! वा ! अंधेर नगरी चौपट राजा,
एक आणा शेर भाजी, एक आणा शेर खाजा (खाऊ).

मूळ स्रोत – भारतेंदु हरिश्चंद्र




**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- संवाद वाचा आणि सहभागींना ऐकवा. शिक्षक आणि सहभागींनी मिळून भूमिकाभिनय सादर करा किंवा क्रमाक्रमाने आपल्या संवादाचे वाचन करा.

## टिपण :

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- इ, ई, ब, त, म, ख, र, च ही अक्षरे लिहिणे, ही अक्षरे असलेले शब्द लिहिण्यास सांगा.
- चला मोजूया व लिहूया सराव करण्यास सांगा.




## संवादासाठी :

1) या चित्रात तुम्हांला काय-काय दिसत आहे?
2) चित्रात कोण काय-काय करीत आहे?
3) तुमच्या परिसरातील चित्राशी मिळत्या-जुळत्या कोण-कोणत्या बाबी आढळतात?
4) चित्रात एकूण किती दुकाने आहेत?



चाहत
ब्यूटी पार्लर
अण्णा डोसा
शिंदे
बँन्ड
करीम
बिर्याणी
हाऊस

# 3. आपली संस्कृती

**आपण शिकूया!**

| ओ | औ | झ | द | ल | ग | क | य |
|---|---|---|---|---|---|---|---|

- 21 ते 50 पर्यंतच्या संख्या ओळखणे, वाचणे आणि लिहिणे.
- एकक आणि दशक समूहामध्ये मोजणे.
- 1 ते 50 पर्यंतच्या संख्याची बेरीज आणि वजाबाकी करणे.

## पाहा, वाचा आणि संवाद करा.



वरात



आकाश पाळणा



बॅण्ड



गोंदणे




नाच



पान



खेळणी



माळ



फुगे

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागींना क्रमाक्रमाने सर्व चित्रांची ओळख करून द्या.
- चित्रांखाली त्यांच्याशी संबंधित शब्द दिलेले आहेत. या चित्रांवरून समर्पक शब्दांचे अंदाज बांधून वाचायला लावा.
- चित्रांखालील शब्दांवर बोट ठेवून वाचण्यासाठी प्रोत्साहित करा.

## सांगा आणि खूण करा.

तुम्ही नेहमी यात्रेत जात असाल. यात्रेत खाली दिलेल्या चित्रातील तुम्ही काय-काय पाहिले आहे त्यावर (√) अशी खूण करा.




भेळ/पाणीपुरीचे दुकान



मातीच्या भांड्यांचे दुकान



बांगड्यांचे दुकान



जिलेबी






तिन चाकी

नेम धरून फुगे फोडण्याचे दुकान





उसाचा रस

बैलगाडी

## वाचा आणि लिहा.

ओ



ओठ



ओढा

ओ ओ ओ

औ



औषध



औत

औ औ औ

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**


- असहभागींना क्रमाक्रमाने चित्रांची ओळख करून द्या.
- चित्रांच्या खाली दिलेल्या शब्दांवर बोट ठेवून वायाचला सांगा.
- त्यांच्याकडून अक्षरे सद्धा लिहून घ्या.

## वाचा आणि लिहा.

झ




झबले



झरा

झ झ झ

झा



झाड



झाडू

झा झा झा

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागींना चित्रे पाहून शब्द वाचण्यास मदत करा.
- त्यांना अक्षरे लिहायला लावा.

## वाचा आणि लिहा.

झि



झिम्मा

झि झि झि

झी



झीज

झी झी झी

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागींकडून दिलेल्या जागेत चित्राचे नाव लिहून घ्या.

## वाचा आणि लिहा.

द




दवाखाना



दही

दा



दात



दाढी

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागींकडून दिलेल्या जागेत चित्राचे नाव लिहून घ्या.

## वाचा आणि लिहा.

दि



दिवा



दिवाळी

दि दि दि

दी



दीक्षाभूमी



दीक्षा

दी दी दी

## वाचा आणि लिहा.

दौ



दौत




दौलत

दौ दौ दौ

य



यज्ञ



यष्टी


य य य

## वाचा आणि लिहा.

**ल**



लवंग




लसूण

ल ल ल

**ला**



लाटणे




लाडू

ला ला ला

## वाचा आणि लिहा.

लि




लिफाफा



लिली

लि लि लि

ली



लीला



लीद

ली ली ली

## वाचा आणि लिहा.

लो



लोक



लोणचे

लो लो लो

लौ




लौकिक


लौ लौ लौ

# वाचा आणि लिहा.

ग



गवत




गजराज

ग ग ग

गा



गाय



गाढव

गा गा गा

## वाचा आणि लिहा.

**गि**




गिर्यारोहक




गिधाड

गि गि गि

**गी**




गीता



गीत

गी गी गी

## वाचा आणि लिहा.

गो



गोफण



गोम

गो गो गो

गौ



गौरी



गौतम बुद्ध

गौ गौ गौ

## ▪ वाचा आणि लिहा.

क



कणीस



कप

का




कारखाना



कार

## वाचा आणि लिहा.

**कि**




किल्ला



किडा

कि कि कि

**की**



कीटक



कीर्तन

की की की

# दिवाळी गीत

दिन दिन दिवाळी,
गाई म्हशी ओवाळी ।
गाई म्हशी कोणाच्या ?
लक्षुमणाच्या ।
लक्षुमण कुनाचा ?
आईबापाचा ।

दिवाळीच्या दिवशी गं, दिवशी गं ।
आंघोळी लवकर करा,
आज मारी नरकासुरा ।
न माझा दिसन देव ।

दिवाळीचा दिवा गं दिवा गं
अंगणी पणत्या लावा गं ।
ओवाळिते दिरा भावा
माझ्या चोळीचा मान ठिवा गं ।

दिवाळीच्या दिवशी गं , दिवशी गं ।
फराळाचं गोड-धोड करा ।
लक्षुमी येईल घरा,
आज लक्षुमी येईल घरा ।

*- अज्ञात*



## वाचा आणि सांगा.

1) दिवाळीच्या दिवशी गाई-म्हशींना का ओवाळतात?
2) या गीतात कोणत्या असुराचा उल्लेख आलेला आहे?
3) तुमच्याकडे दिवाळीशी संबंधित काही विशेष परंपरांचे पालन केले जाते का? त्याविषयी माहिती सांगा.
4) तुमच्या भागात साजऱ्या केल्या जाणाऱ्या तुमच्या आवडत्या सणांची माहिती सांगा.


## माझे शब्द

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- आपल्या राहणीमानावर चर्चा करा. ओ, औ, झ, द, ल, ग, क, य या अक्षरांचे शब्द लेखन करण्यास सांगा.
- सहभागींना विचारून एखादया सणाबद्दलचे 3-4 शब्द लिहा. जसे – दिवाळी सणाशी संबंधित शब्द – लक्ष्मी, पणती, दिवा, गोड-धोड, गाई, म्हशी, नरकासुर, फराळ इत्यादी. हे शब्द सहभागींच्या आपल्या बोलीभाषेतीलही असू शकतात.

## शब्द शोधा आणि लिहा.

आज विलासने खाण्याचे अनेक पदार्थ तयार केले आहेत. खाण्याच्या पदार्थांची नावे ओळखून त्याला वर्तुळ (◯) करा.



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पनीर | कांदा | चिंच | टोमॅटो | टेबल | वाटी |
| चरखा | वाटाणा | ताट | पेला | चटणी | पालक |
| डाळ | भात | वांगे | पोळी | खेळणे | कोशिंबीर |
| फुलपाखरू | चटई | मीठ | पाणी | जग | लाटणे |
| तवा | पातेले | गिरणी | खीर | माठ | चक्की |

## वरील यादीतील खाण्याच्या पदार्थांची नावे लिहा.

| | | | |
|---|---|---|---|
| ________ | ________ | ________ | ________ |
| ________ | ________ | ________ | ________ |
| ________ | ________ | ________ | ________ |
| ________ | ________ | ________ | ________ |
| ________ | ________ | ________ | ________ |
| ________ | ________ | ________ | ________ |
| ________ | ________ | ________ | ________ |
| ________ | ________ | ________ | ________ |

## पहा, वाचा आणि लिहा.

**ओ** चा आवाज असलेला शब्द ओळखा, वाचा व लिहा.

चटणी ओढा चादर तीस

**औ** चा आवाज असलेला शब्द ओळखा, वाचा व लिहा.

बारा जीवन औषध नवीन

**दो** चा आवाज असलेला शब्द ओळखा, वाचा व लिहा.

डमरू दूत चौक दोष

**दौ** चा आवाज असलेला शब्द ओळखा, वाचा व लिहा.

दौलत दत्पर चौकार धपाटा

**लौ** चा आवाज असलेला शब्द ओळखा, वाचा व लिहा.

लोणी मैदा गौरी लौकिक

**ली** चा आवाज असलेला शब्द ओळखा, वाचा व लिहा.

लाल बिल लीना चिवडा

**कौ** चा आवाज असलेला शब्द ओळखा, वाचा व लिहा.

कोट कौरव चौकट डौल

**गी** चा आवाज असलेला शब्द ओळखा, वाचा व लिहा.

गीता गिरिजा गणित आजी

**झो** चा आवाज असलेला शब्द ओळखा, वाचा व लिहा.

होळी टोपी मोळी झोळी

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- शब्द वाचण्यात सहभागींची मदत करा. वेगवेगळे आवाज असलेले शब्द लिहिण्यामध्ये मदत करा.
- हे आवाज शब्दांच्या सुरुवातीला, मधल्या भागात किंवा शेवटीसुद्धा असू शकतात.

## ▪ चला, करून पाहूया!

दिवाळीला रमेशला 1 रुपयांची खूप नाणी मिळाली. त्याने नाण्यांच्या बदल्यात नोट घेण्यासाठी दुकानदाराला 1 रुपयांची 10 नाणी दिली आणि त्या बदल्यात दुकानदाराने त्याला 10 रुपयांची नोट दिली.





जर रमेशने दुकानदाराला 1 रुपयांची 20 नाणी दिली, तर रमेशला 10 रुपयांच्या किती नोटा मिळायला हव्यात? तितक्या नोटांवर वर्तुळ (◯) करा.







## ▪ चला, मोजणे शिकूया.


मिठाईच्या एका डब्यात 10 लाडू आहेत. पाहा, समजून घ्या आणि लिहा.


20 + 1 = 21





= 21


$20 + 2 = 22$  $= 22$


$20 + 3 = 23$  $= 23$


$20 + 4 = 24$  $= 24$


$20 + 5 = 25$  $= 25$

$20 + 6 = 26$  $= 26$

$20 + 7 = 27$  $= 27$

$20 + 8 = 28$  $= 28$

$20 + 9 = 29$  $= 29$


$20 + 10 = 30$  $= 30$

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**


- याप्रकारे पुढील संख्या लिहिण्यास सहभागींना प्रोत्साहित करा.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 30 | + | 1 | = | 31 | 40 | + | 1 | = | 41 |
| 30 | + | 2 | = | 32 | 40 | + | 2 | = | 42 |
| 30 | + | 3 | = | 33 | 40 | + | 3 | = | 43 |
| 30 | + | 4 | = | 34 | 40 | + | 4 | = | 44 |
| 30 | + | 5 | = | 35 | 40 | + | 5 | = | 45 |
| 30 | + | 6 | = | 36 | 40 | + | 6 | = | 46 |
| 30 | + | 7 | = | 37 | 40 | + | 7 | = | 47 |
| 30 | + | 8 | = | 38 | 40 | + | 8 | = | 48 |
| 30 | + | 9 | = | 39 | 40 | + | 9 | = | 49 |
| 30 | + | 10 | = | 40 | 40 | + | 10 | = | 50 |

## ▪ चला, जोडून मोजणे शिकू या!



=



=

■ **खाली दिलेल्या 10 रुपयांच्या नोटा आणि 1 रुपयांची नाणी एकत्र करून किती रुपये होतात त्याचा अंदाज करा आणि उत्तर लिहा.**

| | 10 रुपयांची नोट | | 1 रुपयाचे नाणे | | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| क) |  | + |  | = | 34 |
| ख) |  | + |  | = | |
| ग) |  | + |  | = | |
| घ) | | + |  | = | 22 |
| ङ) | | + | | = | 32 |
| च) | | + | | = | 40 |

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागींना सांगा, की दहा–दहा चा समूह करून मोजल्याने मोठ्या मोठ्या संख्या मोजणे सोपे होते, दहा एककाचे मिळून एक दशक होते, तसेच ही समजही त्यांच्यात विकसित होते.

- **रहिमजवळ 50 रुपये आहेत. त्यात 10 रुपयांच्या 4 नोटा आहेत आणि 1 रुपयांची 10 नाणी आहेत.**



**क) रहिमने आपल्या बहिणीसाठी 15 रुपयांच्या बांगड्या घेतल्या, तर त्याने दुकानदाराला किती नोटा आणि किती नाणी दिली?**

**10 रुपयांची नोट =**

**1 रुपयांची नाणी =**

**ख) रहिमने 22 रुपयांची भेळ खाल्ली तर दुकानदाराला रहिमने किती नोटा आणि किती नाणी दिले असतील ?**

| | दशक | एकक |
|---|---|---|
| **10 रुपयाची नोट =** | | |
| **1 रुपयाचे नाणे =** | | |

**ग) रहिमजवळ 10 रुपयांच्या किती नोटा आणि 1 रुपयांची किती नाणी उरली असतील?**

| | दशक | एकक |
|---|---|---|
| **10 रुपयाची नोट =** | | |
| **1 रुपयांचे नाणे =** | | |


**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- रुपये, मिठाईचे डबे आणि फुलांच्या माळा इ. द्वारा सहभागींमध्ये एकक आणि दशकाची समज विकसित करण्यास सुरुवात केली आहे. सहभागींना स्वतः आपल्या अनुभवावरून असे करण्याची संधी द्या. या प्रकारच्या अन्य संख्या देऊन, सहभागींना प्रोत्साहित करा व त्या संख्यांमध्ये किती दशक आणि किती एकक असतील ते शोधायला सांगा.

- तुमच्या जवळ 10 रुपयांच्या काही नोटा आणि 1 रुपयांची काही नाणी आहेत; तर मग सांगा, की तुम्ही दुकानदाराला खालील वस्तूंचा मोबदला कशा प्रकारे द्याल?

| किंमत | वस्तू | 10 रु. च्या नोटा/नाणी | 1 रु. ची नाणी |
|---|---|---|---|
| ₹ 50 | टोमॅटो | | |
| ₹ 42 | बर्फी | | |
| ₹ 29 | मग | | |
| ₹ 15 | केळी | | |

- मनूजवळ 10 फुलांच्या दोन माळा आहेत आणि 4 सुटी फुले आहेत, तर तिच्याजवळ किती फुले आहेत? दिलेल्या चौकोनात योग्य संख्या लिहा.




दशक ☐ एकक ☐

\+  = एकूण ☐

शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!
- ₹ हे रुपयाचे चिन्ह (प्रतीक) आहे, याची समज विकसित करा.

## मिळून वाचू या!

### प्रसंग - 1



आमचे शिक्षक म्हणतात, ''मुलांनो खूप शिका आणि कष्ट करा. सगळ्यांचे कष्ट देशाला पुढे घेऊन जातात.''
''हो बाळा, जसे आपले शेतकरी, सैनिक, मजूर, खेळाडू इत्यादी कष्ट करतात आणि देशाचे नाव उज्ज्वल करतात.''
''बाबा मी पण कष्ट करून देशाचे नाव उज्ज्वल करेन.''

## संवादासाठी

1. तुमच्या घरातील सदस्य कोणकोणती कामे करतात? ती कामे करताना त्यांना कोणकोणत्या समस्या येतात?
2. तुमच्या मतानुसार कोणकोणते लोक खूप कष्ट करतात?
3. शारीरिक श्रमाची/कष्टाची कामे करणाऱ्यांबाबत साधारणपणे लोकांचे मत काय असते? तुम्ही त्यांच्याशी सहमत आहात काय? असाल तर का?

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागींसोबत श्रम, मजुरी, लिंगसमभाव इत्यादी विषयांवर आधारित चर्चा करा. सहभागींना सांगा, की स्त्री-पुरुष किंवा पती-पत्नी हे एकमेकांना पूरक आहेत, तसेच ते एकमेकांचे सहयोगी आहेत, कष्ट करण्याचे महत्त्व यावर सुद्धा संभाषण करा.

# प्रसंग - 2

''तुम्हांला घरकामात आईला मदत करताना पाहून मला खूप चांगले वाटते बाबा!''

''हो बाळ, एकमेकांच्या मदतीनेच कुटुंब चालते.
पती-पत्नी जीवनसाथी तर आहेतच आणि सहकारी पण आहेत.''

''हो बाबा मी पण घरकामात मदत करेन.''

मूळ स्रोत : आयुष्मान गोस्वामी



## संवादासाठी

1. तुमच्या घरात स्त्री-पुरुष यांमध्ये कामाचे वाटप केले आहे का?
2. जर स्त्री आणि पुरुष दोघेही बाहेर कामाला जात असतील, तर घरी पोहोचल्यावर कोणी कोणत्या जबाबदाऱ्या पार पाडाव्यात असे आपणास वाटते?
3. स्त्री-पुरुष यांमध्ये कामाचे परंपरागत चालत आलेले विभाजन, ही बाब समाजास कशी घातक आहे?
4. वरील दोन्ही गोष्टींमधील मुलाचे उत्तर समाज बदलण्यासाठी कशी मदत करेल यावर चर्चा करा.

# टिपण

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- खाण्याच्या विविध पदार्थांची यादी करण्यास सांगा.
- नोटा व नाणी तसेच अंक वापरून बेरीज करण्यास सांगा.

# वर्णमाला

अ आ इ ई उ ऊ ऋ ऌ

ए ॲ ऐ ओ ऑ औ अं अः

क ख ग घ ङ

च छ ज झ ञ

ट ठ ड ढ ण

त थ द ध न

प फ ब भ म

य र ल व श

ष स ह ळ

क्ष ज्ञ

## श्रेय नामावली

- **लेखन व निर्मिती सहभाग :**

**डॉ. सुचिता राऊत,** अध्यापकाचार्य,
महिला आश्रम अध्यापक महाविद्यालय, वर्धा.
**श्रीम. माधुरी देशमुख,** अध्यापकाचार्य,
महिला आश्रम अध्यापक महाविद्यालय, वर्धा.
**श्री. शीतल वडनेरकर,** शिक्षिका,
जि. प. प्राथ. शाळा क्र. २, वेरूळ (कन्या) ता. आर्वी, जि. वर्धा.
**श्रीम. शुभांगिनी वासनिक,** शिक्षिका,
जि. प. शाळा, सुलतानपूर, ता. हिंगणघाट, जि. वर्धा.
**श्रीम. दीपा गिरी,** शिक्षिका,
जि. प. प्राथ. केंद्र शाळा, तळेगाव (टा.), ता. वर्धा, जि. वर्धा.
**श्रीम. नेहा साळुंखे,** सहा. शिक्षक,
शासकीय विद्यानिकेतन, जि. धुळे.
**श्री. सूरज सावळे,** सहा. शिक्षक,
शासकीय विद्यानिकेतन, जि. धुळे.

